रविवार
ऐक्य
९१ वर्षांची वाचनीय परंपरा
site : www.dainikaikya.com सातारा रविवार दि. ८/११/२०१५ email : news@dainikaikya.c

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात संधी दिल्यास भावी जीवनात फायदाच होणार : प्राचार्य डॉ. ठाकूर

**कोरेगाव,** दि. ७ : वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून आजचा विद्यार्थी एक आदर्श नागरिक म्हणून घडविला जाईलच, त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकासही घडवून आणला जाईल. विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात संधी दिल्यास त्याचा फायदा त्यांना भावी जीवनात निश्चितच होईल, असा विश्वास रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी व्यक्त केला. रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये सोमवारपासून सुरू झालेल्या ५३ व्या शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धांचे शानदार उदघाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील हे होते. डॉ. ठाकूर पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्यामध्ये असणारी गुणवत्ता सिद्ध करावी. खेळातूनच मोठे होता येते. एवढेच नव्हे तर एकसंध भावनेचा आदर्शही खेळामुळेच निर्माण होतो. विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाबरोबर वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळवावे. डॉ. पाटील म्हणाले, मानवी जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी क्रीडा स्पर्धांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून प्रयत्न करावेत, यश निश्चित मिळत असते. या आंतर विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील ७७ महाविद्यालयातील स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत ४० प्रकारच्या क्रीडा स्पर्धा होणार आहेत. प्रा. बाळकृष्ण भोसले, प्रा. दीपक डांगे, प्रा. अरुण पाटील यांनी स्पर्धेचे संयोजन केले. प्रा. सौ. पद्मिनी मोकाशी व प्रा. प्रदीप पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. बी. पवार यांनी आभार मानले.